**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे-३३ दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट

## इंडस्ट्रीयल कंपनीमध्ये मोबाईल कंपनी टॉवर पार्टची घरफोडी करणारी टोळी जेरबंद, १० लाख ६२ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची उल्लेखनिय कामगिरी

दि.०४/०८/२०२३ रोजी गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे मार्गदर्शनाखाली बाळु कोकाटे, सोमनाथ बोऱ्हाडे, महादेव जावळे, मनोजकुमार कमले,अजित रुपनवर असे पोलीस पथक चिखली पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या चिखली पोलीस ठाणे गु.रजि.नं.४६६/२०२३ भादंवि कलम **४५४,४५७,३८०** या घरफोडी चोरीच्या गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनिट १ चे पथकास माहिती मिळाली की, एक इसम हा सदर गुन्हयातील चोरीचा माल भरून घेवुन जाधववाडी राम मैदानामध्ये टेम्पोसह थांबलेले आहे अशा मिळाले माहिती वरून पोलीस पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे सुचना प्रमाणे जाधववाडी, राम मंदिर मैदान परीसरामध्ये सापळा लावुन इसम नामे **जमीरुल्लाह हकिकुल्लाह सहा,वय ४६ वर्षे,रा.चेतन जाधव यांचे रुममध्ये भाडयाने,वडाचा मळा,जाधववाडी, चिखली,पुणे** यास पकडले. तेव्हा त्यांच्या ताब्यात मध्ये **एक टेंम्पो व टेंम्पोमध्ये मोबाईल टॉवरसाठी वापरण्यात येणारे तीन नविन रेडिमेड टिसीयु बॉक्स असा एकुण १० लाख ६२ हजार रूपयांचा** मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला आहे.

आरोपी यांचेकडुन जप्त करण्यात आलेल्या माला बाबत अधिक सखोल तपास करता त्यांचे ताब्यात मिळुन अलेल्या **मोबाईल टॉवरसाठी वापरण्यात येणारे तीन नविन रेडिमेड टिसीयु बॉक्स** हे त्याने त्याचे तीन साथीदार यांचेसह धनश्री इंजिनियरींग गोडाऊन,जाधावाडी, चिखली,पुणे येथील गोडाऊनचे कुलूप तोडुन घरफोडी चोरी केल्याचे निष्पन्न झाले असुन त्याबाबत

**चिखली पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ४१२/२०२३ भादवि कलम ४५४,४५७,३८०** अन्वये गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त परदेशी, पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलीस आयुक्त सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील,पोलीस उप निरीक्षक शेख,पोलीस अंमलदार बाळु कोकाटे, सोमनाथ जावळे, महादेव जावळे, अजित रूपनवर, शिवाजी कानडे, मनोजकुमार कमले,फारुक मुल्ला, अमित खानविलकर, गणेश महाडिक, सचिन मोरे, उमाकांत सरवदे, प्रमोद हिरळकार, प्रमोद गर्जे, विशाल भोईर, मारोती जायभाये, तानाजी पानसरे,स्वप्नील महाले यांचे पथकाने केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे